CMYK

बीड । शनिवार
०३.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले ?

## मी दिलं आहे का ? मी तरी दिलं नाही...

## उपमुख्यमंत्री अजितदादांनी हात झटकले




**कोल्हापुर । प्रतिनिधी**

महायुती सरकारने सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात जाहीरनाम्यामध्ये घोषणा केली होती. मात्र, सत्तेत आल्यानंतर निधीचे कारण देत शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. यासंदर्भात सातत्याने विरोधकांकडून टीका होत असताना आज (२ मे) उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापूरमध्ये बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अक्षरशः हात झटकले. त्यामुळे कर्जमाफीवरून पुन्हा एकदा राज्यामध्ये रणकंदन होण्याची शक्यता आहे.

कोल्हापुरात या संदर्भात बोलताना अजित पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचं आश्वासन कोणी दिलं? मी दिलं आहे का? मी दिलं आहे का? मी तरी दिलेलं नाही, असं म्हणत एक प्रकारे या मुद्द्याला बगल देण्याचा प्रयत्न केला. दरम्यान अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात केलेल्या वक्तव्यानंतर आता शेतकऱ्यांमध्ये रोज असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे. महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आलं होतं. दरम्यान, लाडकी बहीण हप्त्याच्या संदर्भाने अजित पवार यांनी भाष्य केले. ते म्हणाले की लाडक्या बहिणी योजनेचं आम्ही नियोजन केलं आहे. आदित्य तटकरे यांनी सांगितल्यानंतर तातडीने नियोजन केलं असून सगळ्या योजनांचे पैसे देण्याचा प्रयत्न करत असल्याचे अजित पवार म्हणाले. दरम्यान, पालकमंत्रीपदावरून बोलताना अजित पवार यांनी काही अडलं आहे का? अशी विचारणा केली. ते म्हणाले की रायगडला पालकमंत्री दिलं नाही म्हणून काही अडलं आहे का? सर्व कामे होत आहेत, कोण काय बोललं याबद्दल मला विचारू नका, असं म्हणत त्यांनी खासदार संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर बोलण्यास नकार दिला.

दुसरीकडे, मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्र्यांनी कर्जमाफीचे खोटी आश्वासने दिल्याने दररोज राज्यातील सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. यामुळे राज्याचे मुख्यमंत्री पहलगाम हल्यातील अतिरेक्यापेक्षाही क्रूर झाले असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे. माळसोन्ना ते परभणी

▶▶ उर्वरित पान २ वर

## 'तो' पंकजा मुंडेंना पाठवत होता अश्लील मेसेज ! मग पुढे...

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या नेत्या पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज आणि त्रासदायक कॉल करणाऱ्या तरुणाला महाराष्ट्र नोडल सायबर पोलिसांनी अटक केली आहे. अमोल काळे (वय २५) असे आरोपीचे नाव असून, तो पुण्यात राहत असून मूळचा बीड जिल्ह्यातील आहे. या प्रकारामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.



आरोपी अमोल काळेचा शोध आणि अटकेची कारवाई : मुंबईतील नरिमन पॉइंट येथील भाजप कार्यालयात सोशल मीडिया समन्वयक म्हणून कार्यरत असलेल्या निखिल भामरे यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ७८ आणि ७९ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये एफआयआर नोंदवला.

आरोपी अमोल काळे याने ज्या मोबाइल नंबरवरून पंकजा मुंडे यांना कॉल आणि मेसेज पाठवले, त्या नंबरच्या आधारे पोलिसांनी त्याचा ठावठिकाणा शोधून काढला. लोकेशन ट्रेस केल्यानंतर तो पुण्यातील भोसरी भागात असल्याचे समोर आले. तातडीने कारवाई करत सायबर पोलिसांनी भोसरी पोलिस स्टेशनच्या मदतीने त्याला अटक केली.

गुन्ह्यामागचा हेतू काय ?

चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यानंतर त्याला बीएनएस कायद्यानुसार ▶▶ उर्वरित पान २ वर

## कांदा काढणीसाठी निघालेल्या मजुरांच्या पिकअपला भीषण अपघात

### ३ महिला ठार, १५ गंभीर जखमी

**आष्टी । प्रतिनिधी**

कामगार दिनाच्या दिवशी कांदा काढणीसाठी निघालेल्या महिला मजुरांच्या पिकअप वाहनाला गुरुवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास बीड-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर १५ महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.



सकाळी धामणगाव परिसरातून कांदा काढणीसाठी महिलांचा गट पिकअपमधून रवाना झाला होता. मात्र रस्त्यातच वाहनाचा टायर अचानक फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि पिकअप रस्त्याच्या कडेला पलटले. वाहनात सुमारे १८ ते २० महिला मजूर होत्या. पलटी झाल्याने काही महिला वाहनाखाली अडकल्या. घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिकांनी पोलिसांना अपघाताची माहिती दिल्यानंतर पोलीस आणि प्रशासन घटनास्थळी पोहोचले. जखमी महिलांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## दारूसाठी पैसे देण्यास नकार दिल्याने केली हत्या

### चुलतीचा पुतण्याकडून कुऱ्हाडीने निर्घृण खून!

**परळी । प्रतिनिधी**

दारू पिण्यासाठी पैशांची मागणी फोल ठरल्याने रागाच्या भरात २५ वर्षीय पुतण्याने आपल्या ६५ वर्षीय चुलतीचा घरातच कुऱ्हाडीने सपासप वार करत निर्घृण खून केला. ही हृदयद्रावक घटना परळी तालुक्यातील कावळ्याची वाडी येथे गुरुवारी सायंकाळी घडली.



मृत महिलेचे नाव परिमाला बाबुराव कावळे (वय ६५) असून, आरोपीचा नाव चंद्रकांत धुराजी कावळे (वय २५) आहे. चंद्रकांत हा व्यसनाधीन असून, तो दररोज दारू पिण्यासाठी चुलतीकडे पैशांची मागणी करत होता. परिमाला या कधीमधी त्याला पैसे द्यायच्या, मात्र रोजच्या त्रासाला कंटाळून त्या यावेळी नकार देत होत्या. ▶▶ उर्वरित पान २ वर

### मुलानेच केला दगडाने ठेचून आईचा खून

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

चक्क दारू पिण्यासाठी पैसे दिले नसल्याने पोटच्या मुलाने वृद्ध आईचा दगडाने ठेचून निर्घृण खून करण्यात आला आहे. ही घटना अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे सकाळी समोर आली आहे. मृत महिलेचे नाव चोत्राबाई भानुदास सोन्नर (वय अंदाजे ७२ वर्षे) असून याप्रकरणी आरोपी मुलाला अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



ही घटना अंबाजोगाई तालुक्यातील मौजे येल्डा येथे रात्री बारा वाजेच्या दरम्यान घडली असुन आज सकाळी समोर आली आहे. मृत महिलेचे नाव चोत्राबाई भानुदास सोन्नर (वय अंदाजे ७२ वर्षे) असून याप्रकरणी आरोपी मुलाला अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मौजे येल्डा येथील चोत्राबाई भानुदास सोन्नर या आपल्या मुलगा, सून नातवंडासह मौजे एल्डयेथे राहतात त्यांचा मुलगा अमृत वय अंदाजे पंचेचाळीस यास दारू पिण्याची सवय असून तो नेहमी दारू पिऊन धिंगाणा व

▶▶ उर्वरित पान २ वर

## धारूरमध्ये पोलिसांचा गुटखा माफीयांना दणका; गुटखा विक्रेत्यावर धाड; दोन पोते गुटखा ताब्यात



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील बस स्थानक परिसरामध्ये गुटखा विक्री करणाऱ्या एका किराणा दुकानांमध्ये पोलिसांनी धाड टाकून २४ हजार ५५० रुपये किमतीचा गुटखा पकडला .याप्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धारूर शहरात मागील काही दिवसापासून मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री खुल्या प्रमाणे होत आहे .पोलिसांनी बस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या खानावळ येथे एका किराना दुकानांमध्ये २००० च्या जवळपास गुटख्याच्या पुढ्या व तंबाखूजन्य पदार्थ सिगारेट आधी साहित्य शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आढळून आले . २४ हजार ५५०किमतीचे असून पोलिसांनी जप्त केले आहे .प्रकरणी पोलिसांनी आरोपी शेख मोहसीन शेख फारूख रा धारूर याचे विरोधात धारूर पोलीस

▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकनेते सोळंके कारखान्याच्या बगॅज व इतर साहित्यासह आग; लाखोंचे नुकसान

### अति तापमानामुळे आग लागल्याची शक्यता

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅज व इतर साहित्याला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागली.या आगीत कारखान्याचे लाखो रूपयाचे नुकसान झाल्याची माहिती असुन, सदरील आग अति तापमानामुळे लागली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.तर आग आटोक्यात आणण्यासाठी कारखान्यासह धारूर, वडवणी,माजलगाव येथील अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी वेळीच आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले.अन्यथा खुप मोठी दुर्घटना घडली असती.



तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅज कनव्हेअरला दि. २मे शुक्रवार रोजी दुपारी बारा ते सव्वा बारा वाजे दरम्यान अचानक आग लागली. कांही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण करीत आग मोठ्या प्रमाणात फलावली. यात मोठ्या प्रमाणात बगॅज जळालाच शिवाय तेथे असलेले इतर साहित्यासही आग लागुन ते जळुन खाक झाले.ही आग लागल्याचे लक्षात येताच तेथे ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी कारखाना कार्यालयास कळवले असता तेथून तात्काळ कारखान्याच्या अग्नीशमन बंबास पाचारण करून आग विझवण्याचा प्रयत्न केला.परंतु आग वाढतच असल्याने कारखाना कार्यालयाने माजलगाव, वडवणी, धारूर येथील नगर परिषदच्या अग्नीशमन बंबास ही पाचारण केले.या तिन्ही ठिकाणाहून कांही वेळात

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# भ्रष्टाचार थांबणार तरी कधी ?

भारत देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे तर दुसऱ्या बाजूने भ्रष्टाचाराची कीड भारतीय व्यवस्थेला खिळखिळी करत आहे. आजमितीला गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचाऱ्यांची प्रमुख लक्षणे आहेत. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून घ्यायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लगेच हा सरकारी खात्यांचा जणू अलिखित नियम बनला आहे. भ्रष्टाचारावर आळा बसण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत; मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्यातूनही भ्रष्टाचाराच्या विविध वाटा शोधून काढल्या आहेत. आज देश मोठ्या युद्धाच्या तयारीत आहे त्यासोबत गृहयुद्ध भडकू नये याचीही सिद्धता करत आहे, तर दुसऱ्या बाजूने सरकारी अधिकारी भ्रष्टाचाराच्या धनातून आपल्या पुढच्या कित्येक पिढ्यांची सोय करत आहेत. इतरांच्या कष्टाचा पैसा ओरबाडून यांच्या पुढच्या पिढ्या खरोखर सुरक्षित जीवन जगणार आहेत का ? यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा अहवाल आला असून यंदा राज्याच्या महसूल खात्याने पोलीस खात्यालाही मागे टाकले आहे. १ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना अटक करण्यात आली आहे. ज्यामध्ये महसूल खात्याचे ५६ तर पोलीस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत. सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार असल्याने अन्य प्रकरणे ही अन्य सरकारी खात्यांच्या संदर्भातील आहेत ज्यामध्ये पंचायत समिती मधील २५, महावितरण खात्यातील मधील १२, महापालिका प्रशासनातील १०, जिल्हा परिषदेतील १०, आरोग्य विभागातील १० आणि शिक्षण विभागातील ८ प्रकरणे उघडकीस आली आहेत . प्रत्येक सरकारी कार्यालयात 'लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे' अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते; मात्र या पाटीखालीच सर्वाधीक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. लाच मागणाऱ्याच्या विरोधात तकार प्रविष्ट करण्याचे आवाहन लाच-लुचपत खात्याकडून वेळोवेळी केले जाते, त्यासाठी जागृतीही केली जाते ज्याचा परिणाम म्हणून लाच मागणाऱ्यांच्या



विरोधात तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत नक्कीच वाढले आहे; तरीही आपली कामे लवकर करून घेण्यासाठी या भ्रष्टाचाऱ्यांची पोटे भरणाऱ्यांचीही या देशात कमी नाही. शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरिक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

पान १ वरून पुढे...

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे...

जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या शेतकरी आत्म हत्या आक्रोश पदयात्रेत त्यांनी सडकून टीका केली. महायुती सरकारने निवडणुकीत दिलेले संपूर्ण कर्जमुक्तीचे आश्वासन पाळून तातडीने राज्यातील शेतक-यांची कर्जमाफी करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संपुर्ण कर्जमुक्तीबाबत शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने शेतकऱ्यांच्या लेकरा-बाळांना अनाथ करून त्यांच्या पत्नीचे कूंकू पुसण्याचे पाप केले जात आहे. फडणवीसांनी १०० दिवसाच्या सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करताना शेतकरी आत्महत्या किती झाल्या याचा लेखाजोखा तपासावा म्हणजे तुमच्या अपयशाचा आरसा तुम्हाला दिसेल, असे ते म्हणाले. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणामुळे शेती व्यवसाय तोट्यात चाललेला आहे. देशातील ६.५० लाख हेक्टर त राज्यातील ३.५० लाख हेक्टर शेतीपासून कमी झालेली आहे हे विदारक चित्र केंद्र व राज्य सरकारच्या अपयशाचा आरसा आहे. उद्योगपतींच्या फायद्यासाठी राबविण्यात येणारे आयात-निर्यात धोरण, नैसर्गिक आपत्ती, सततची नापिकी, पिकविमा कंपन्यांची नफेखोरी, दुष्काळ, महापूर, अतिवृष्टी यासारखी संकटांनी शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

## 'तो' पंकजा....

नोटीस देण्यात आली आणि अधिक तपासासाठी मुंबईत आणण्यात

पान १ वरून पुढे...

आले. औपचारिकरित्या त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपी अमोल काळे हा विद्यार्थी असून त्याने अश्लील भाषा का वापरली आणि त्यामागील हेतू काय होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. अशा प्रकारची गंभीर सायबर गुन्हेगारी राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते, त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

## कांदा काढणीसाठी....

अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू असून टायर फुटल्याने अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.

कांदा काढणीसाठी दरवर्षी महिलांची मोठ्या प्रमाणावर मजुरीसाठी ने-आण केली जाते. मात्र अशा अपघातांमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कामगार दिनीच घडलेल्या या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## चुलतीचा पुतण्याकडून...

गुरुवारी सायंकाळी ६ वाजता पैसे न दिल्याने चंद्रकांतने रागाच्या भरात घरातील कुऱ्हाड उचलली आणि चुलतीच्या डोक्यावर तसेच अंगावर सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात परिमाला कावळे यांचा जागीच मृत्यू झाला. आरोपी चंद्रकांत कावळे खून करून घटनास्थळावरून फरार झाला आहे. या प्रकरणी सिरसाळा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात पाठवण्यात

पान १ वरून पुढे...

आला आहे.

## मुलानेच केला...

शिवीगाळ करतो यामुळे त्याचे कुटुंबीय वैतागले आहेत. पंधरा दिवसांपूर्वीच अम्रतने त्याची पत्नी व मुलांना भांडण करून सासरी पाठवून दिले आहे. त्यामुळे घरी आई व मुलगा सध्या दोघेच असून रात्री बारा वाजता दरम्यान अमृत याने आईला दारू पिण्यासाठी पैसे दे म्हणून हुज्जत घालू लागला त्यावेळेस आईने त्याला पैसे दिले नाहीत. म्हणून चिडून जाऊन आम्रतने जवळच दगड गोटे उचलून आईच्या अंगावर टाकून दगडाने ठेचून मारहाण करू लागला यातच प्रचंड रक्तस्त्राव झाल्यामुळे जागीच त्यांचा मृत्यू झाला आहे. सदरील मुलगा हा नेहमी दारू पिऊन भांडण करतो व भांडण सोडवायला येणाऱ्याशी भांडण करतो. त्यामुळे ज्यावेळेस आरडाओरडा होत होता त्यावेळेस भीतीपोटी कोणीही शेजारीपाजारी धावून आले नाहीत. त्यामुळे वृद्ध चोत्राबाई यांचा नाहक पोटच्या गोळ्यानेच दगडाने ठेचून बळी घेतला असून या घटनेमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. आरोपी अमृत यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यावर गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरू आहे. माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी करण्यात आली असून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात हलविण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी चोत्राबाई यांचा मुलगा अमृत भानुदास सोन्नर यास ताब्यात घेतले असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे येल्डा गावात खळबळ उडाली आहे.

पान १ वरून पुढे...

## धारूरमध्ये पोलिसांचा....

ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे .पुढील तपास सुरू आहे पहाडी पारगाव येथे इसम नामे बालासाहेब रोहिदास मस्के व ४७ वर्ष राहणार पहाडी पारगाव याचेवर दारूबंदी अधिनियम अन्वये कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याकडे ९० ml च्या २२ बाटल्या मिळून आलेले आहेत. तसेच जुगार खेळणारे ३ इसम यांचेवर जुगार अधिनियम अन्वये कारवाई करून तीन मोबाईल मोटार सायकल व रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, पोलीस उपनिरीक्षक बालासाहेब भवर, पोलीस कॉन्स्टेबल भुसारे आप्पा अशोक गवळी तुकाराम चांदने सह पोलीस कर्मचारी यांनी केली

## लोकनेते सोळंके...

कारखाना येथे अग्नीशमन बंब आले.त्यांनी शर्तीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.चार अग्नीशमन बंबाच्या सहाय्याने एक तासात आग आटोक्यात आणण्यात यश आले.कारखान्याच्या प्राथमिक अंदाजानुसार १०० मे.ट.बगॅज, रबर बेल्ट सी सी ४ ,बी सी ३,बी सी-८ व ट्रॅश कटर,इलेक्ट्रिक मोटार, केबल, डलर, ड्रम आदि साहित्य जळाल्या प्राथमिक अंदाज आहे.त्यामुळे आगीत कारखान्याचे लाखो रू नुकसान झाले आहे.गेल्या कांही दिवसांपासुन तापमानात मोठी वाढ होत असुन, अति तापमानामुळे ही आग लागल्याची शक्यता प्रत्यक्षदर्शी वर्तवत होते.दरम्यान आगीची माहिती कारखान्याने दिंद्रुड पोलीस ठाण्यात दिली आहे.

पान ४ वरून पुढे...

## किल्ले धारूर...

आगारातील कर्मचारी गजेंद्र नागरगोजे,बिककड साहेब, मोदी साहेब,नडगिरे साहेब, डी.बी.मुंडे, जगदीश थोरात, अजय सोनटक्के, सिद्धार्थ वाघमारे, नामदेव तिडके, राजमाने, विलास शिंदे, रामदास नेहरकर, अशोक चुंचे, दिनेश कंकाळ अविनाश पांचाळ धनराज चाटे यांच्यासह असंख्य कर्मचारी व तसेच कामगार संघटनेचे पदाधिकारी ही उपस्थित होते

## गुटख्याच्या साठ्यावर...

या मुद्देमालाची अंदाजे किंमत ९,२८,५००/- रुपये इतकी आहे.या प्रकरणी पो.ह. ६९० शेख नासीर शेख बशीर यांच्या फिर्यादीवरून शेख इकबाल आणि शेख जावेद उर्फ बब्बू (रा. बीड) यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन पेठबीड येथे गु.र.नं. १२४/२०२५ अन्वये भारतीय दंड विधान कलम १२३, २७४, २७५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पो.ह. १६८२ शरद बहीरवाळ, पो.ह. १४८ धनंजय गायकवाड, पोशि. ८८७ अविनाश सानप, पोशि. ४०७ कुलदीप गुंजाळ यांनी संयुक्तपणे केली.पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा अवैध धंद्यांविषयी किंवा अन्य गोपनीय माहिती असल्यास 'संवाद प्रकल्प'चा टठ कोड स्कॅन करून तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## इंग्रजी माध्यमाच्या...

घटस्फोटीत, निराधार व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निम शासकीय नोकरदार नसावेत, प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामूल्य उपलब्ध असून दिनांक २३ मे २०२५ पर्यंत परिपूर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. तरी या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपूर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार असून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स

पान ४ वरून पुढे...

मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याबाबतचे आवाहन प्रकल्पाधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## सर्जरी विभागाचे...

राज्य स्तरीय अभियान राबवून गेली सहा वर्षापासून अविरत काम करून प्रथम क्रमांकावर येण्याचा मान त्यांनी मिळवून दिला आहे या योजनेमधून आजपर्यंत हजारो रुग्णांना फायदा झालेला आहे.

स्वाराती रुग्णालयामध्ये सर्जरी विभागाअंतर्गत मॉस्कीटो नेट मेश या अत्यल्प दरातील हर्निया सर्जरीची आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंद घेण्यात आलेली आहे.त्याच कालावधीमध्ये स्वाराती रुग्णालयात थायरॉईड सर्जरीची अभिनव अभियान राबून कमी टाक्यांची मिनी-इंसिजन थायरॉईड शस्त्रक्रिया करणारे राज्यातील पहिले व एकमेव केंद्र बनवले आहे.सर्जरी विभागातील सहयोगी प्राध्यापक म्हणून आजपर्यंत त्यांच्या अनुभवाचा व कार्याचा रुग्णांना खूप मोठा फायदा झालेला आहे यामुळे परिसरातील जनतेचे आशीर्वाद व रुग्णांनी दिलेली प्रेमाची थाप हीच आपली शिदोरी समजून सेवेचे कार्य अविरतपणे चालू ठेवले याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये यश संपादन करून सर्जरी विभागातील प्राध्यापक म्हणून आज डॉ. नितीन चाटे सर यांना पदस्थापना करण्यात आली आहे.त्यांच्या निवड प्रसंगी जनतेतील व्यक्तींनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

स्वाराती रुग्णालयामध्ये गेली आठ वर्षापासून काम केल्याची मला पावती मिळाली माझ्याकडून जास्तीत जास्त रुग्णांची सेवा अविरतपणे अशीच घडत राहो अशी मी योगेश्वरी माते चरणी प्रार्थना करतो. जास्तीत जास्त रुग्णांना याचा फायदा व्हावा हीच माझी इच्छा आहे.-प्राध्यापक डॉ. नितीन चाटे. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर ....

ध्वजारोहण करण्यात आले. उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्राम पंचायत सदस्य,मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बौद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात

पान ४ वरून पुढे...

आले.यावेळी कार्यक्रमाचे आयोजन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ केले. अध्यक्षस्थानी असलेल्या रविंद्र निर्मळ यांनी भारत देशातील सर्व नागरिकांना सामाजिक न्याय मिळवून देणा-यासाठी देशाला बाबासाहेबांच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

सायंकाळी ५ वाजता गावातील प्रमुख चौकातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची निळ्या ध्वजांनी सुशोभित सजवलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली.आदल्यादिवशी भिमगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाचे आयोजन जितेंद्र निर्मळ, बालाजी निर्मळ,आरूण निर्मळ, पप्पू निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक भिमजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शंकर निर्मळ , उपाध्यक्ष अमोल निर्मळ, सचिव स्वप्निल वक्ते, कोषाध्यक्ष स्वप्निल निर्मळ ,सौरभ, निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड , प्रकाश निर्मळ, पोपट निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ आदिच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभागी होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

## आष्टी तहसील...

राष्ट्रगीत अर्ध्यातून सुरू झाल्याचा प्रकार तात्काळ लक्षात येताच आ.सुरेश धस यांनी घटनेचे गांभीर्य पाहून या बाबतीत हलगर्जी पणा करणाऱ्या संबंधित प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना तहसीलदार यांना दिल्या.

तहसीलदार वैशाली पाटील यांनी हात झटकले- राष्ट्रगीत हे अर्ध्यातूनच सुरू झाल्याने याबाबत तहसील प्रशासनाची चूक असल्याचे निदर्शनास आल्यानंतर उपस्थित पत्रकारांनी या प्रकाराविषयी तहसीलदार वैशाली पाटील यांना प्रतिक्रिया विचारताच असा प्रकार घडलाच नसल्याचे सांगत तुम्हीच शहानिशा करा म्हणत हात झटकण्याचे काम केले.

## माजलगाव शहराला....

यावी व त्यांच्याकडील न.प. प्रशासक चा कार्यभार काढून घेऊन तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे देण्यात यावा या मागणीसाठी दि. ०२ मे २०२५ नगरपरिषद कार्यालया माजलगाव समोर रास्तारोको आंदोलन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव नगरपरिषदेची

पान ४ वरून पुढे...

निवणुकीची मुदत दि.०४/०३/२०२२ ला संपली आहे म्हणून न.प.मध्ये दि.०५/०३/२२ पासून प्रशासक म्हणून काम करण्यात येत आहे. या मध्ये दि१७/०९/२०२३ पासून मुख्याधिकारी आणि प्रशासक म्हणून चंद्रकांत इंद्रजीत चव्हाण हे काम पाहत आहेत. या महाशयांनी आपल्या दोन्ही पदे आपल्याक डे असल्याने या पदाच गैर फायदा घेत शहरातील बहुतांशी ओपन स्पेस, गायरान जमिनीवर खरेदी विक्री के ल्याचे अनेक क रण्यात आले आहे. न.प. मध्ये नागरिकांना पी.टी.आर., नाहरकत, जन्म मृत्यु प्रमाणपत्रब, बांधकाम परवान्यासाठी व इतर कामासाठी नागरिकांना वेतीस धरू न आर्थिक व्यवहार करून कामे के ली जातात माजलगाव न.प. मध्ये कायम स्वरूपीकर्मचारी असताना देखील खासगी कंपनी कडून मनुष्य बळ पुरवठा करण्याचे कंत्रट देऊन लाखो रुपये या मध्ये भ्रटाचार के ला जात आहे.

पाणीपुरवठा, नळलिकेज, स्वच्छता कामाचे आदी कामाचे कंत्रटदारास टेंडर देऊन संगनमताने देऊन कोठचावधी रुपयाचा भ्रष्टाचार के ला आहे. त्याच बरोबर माजलगाव नगरपरिषदे मध्जिये जन्म, मृत्यु, मालमत्ता कर ऑनलाईन असताना देखील. नगर परिषदेस नियोजन तर्फे सन २०२४-२५ साठी दलित वस्ती सुधार योजना, दालित्तोतर, नागरोथान योजना या साठी ६ कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला सदरील योजनेतून विकास कामाच्या निविदा शासन निर्णयाविरुद्ध ऑनलाईन नकरता ऑफ लाईन करुन मर्जीतील गुतेदारास आर्थिक संगनमत करून लाभ देत आहेत.

तरी मुख्यअधिकारी चव्हाण यांनी त्यंच्या १९ महिन्याच्या सर्व मनमानी कामाची चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी व त्यांच्याकडे असलेला न.प. प्रशासक असलेला कारभार तहसीलदार किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याकडे देण्यात यावा या मागणीसाठी शिंदे सेनेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. आंदोलनात शिवसेना माजलगाव तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड विनोद कुलथे विजय मौजकर कल्याण कस्पटे पंडित वगैरे विलास नेमाने अशोकजी डोने दत्ता शिंगाडे विनायक किशोर पाबळे सोनटक्के तुळशीराम धरपडे श्याम पासंगे अनिल आव्हाड इमरान पठाण सौ अंजना डोंगरे सुभाष राव सोळंके प्रशांत टमके बाळराजे थोरात राहुल बावणे अमोल धारक अतुल जाधव प्रमोद शिंदे सुशील हांडे बाबा वगैरे सुनील गायगावे निशिकांत पाटील सोमेश्वर धारक राजेश कोंबडे त्यांचे सह शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मा. राज्यमंत्री, श्री. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते १ मे रोजी जिल्हा क्रीडा पुरस्कारांचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समिती, बीड मार्फत सन २०१९-२० मधील जिल्हा क्रीडा पुरस्कारांचे वितरण मा. राज्यमंत्री, श्री. इंद्रनील नाईक यांच्या हस्ते १ मे २०२५ रोजी पोलीस मुख्यालय, बीड येथे करण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली. पोलीस मुख्यालय, बीड येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिनांच्या



शासकीय ध्वजारोहन प्रसंगी उद्योग व सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास पर्यटन, मृद व जलसंधारण राज्यमंत्री मा.ना.श्री. इंद्रनील अनिता मनोहर नाईक यांच्या हस्ते तायक्कांदो खेळाचा आंतरराष्ट्रीय खेळाडु श्री. अविनाश भरत पांचाळ (गुणवंत क्रीडा मार्गदर्शक), तायक्कांदो प्रशिक्षीका श्रीमती जयश्री अविनाश बारगजे (गुणवंत क्रीडा संघटक / कार्यकर्ती पुरस्कार), राष्ट्रीय शालेय तायक्काँदो सुवर्णपदक विजेत खेळाडु कु. गौरी कमलेश मुंदडा (गुणवंत खेळाडु पुरस्कार महिला) व राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता तायक्काँदो खेळाडु प्रणवकुमार दत्ता सिरसाठ (गुणवंत खेळाडु पुरस्कार पुरूष) यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व प्रत्येकी १० हजार रूपये रोख देऊन जिल्हा क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी मा. जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्स, मा. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आदित्य जीवने, मा. जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. नवनित कॉवत, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर, महाराष्ट्र राज्य तायक्काँदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०१९-२० चे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा अधिकारी श्री. अनिकेत काळे, श्री. कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक श्री सतिष राठोड, श्री. अविनाश पाटील, श्री. रेवननाथ शेलार, श्री. धनेश करांडे, श्री. जितेंद्र आराक, श्रीमती त्रिगुणा वाघमोडे, श्रीमती प्रिती काळे यांनी परिश्रम घेतले.

## जिल्ह्यात शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. २ मे रोजी बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करत या सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उदंड प्रतिसाद मिळत असून जिल्ह्यासाठी



दिलेले सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला. लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेल्या शिवसंग्राम 'संघटन सर्वोपरि ' या विचारधारेने कार्य करणाऱ्या संघटनेत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे , रामदास नाईकवाडे, ज्ञानेश्वर कोकाटे, मनोज जाधव ,सुनील शिंदे ,शेख कुतुब भाई, शेख आबेद, संगीता ठोसर, शेषेराव तांबे, सुशील कांबळे, कैलास शेजाळ, विठ्ठलराव ढोकणे, राजेंद्र आमटे , अशोक लोकरे, रायचंद कापसे, देविदास मेंगडे , धर्मराज मागदे, पंडित शेंडगे ,हरीचंद्र ठोसर, गणेश धोंडरे,संदीप नवले, ओकार पाटील, आदी उपस्थित होते.

## अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट स्व . बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब



आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख श्री. मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली.



*तलवाडा : बोधेगाव येथे सय्यद बादशाह निजाम, सदस्य. जमाते इस्लामी हिन्द तर्फे ईद मिलन, सद्भावना सम्मेलन दिनांक १ मे २०२५ रोजी सांय. ७ वाजता बन्नोमा दर्गा, बोधेगांव येथे संपन्न. या वेळी डॉ. रफीक सय्यद पारनेरकर साहेब (सचिव धार्मिक जनमोर्चा व सदभावना मंच जमाते ईस्लामी हिंद. महाराष्ट्र) यांच्यासह बोधेगावचे हाजी शेख शफिक बाबामियाँ, पैठणचे अँड इमरान शेख, श्री जाकीर शेख, बादशाह शेख, तीसगाँव चे अँड अयाज शेख, वसीम मुजावर, जमाते इस्लामी हिंद वे जिल्हा: संघटक डॉ. साजिद सय्यद, मौलाना फारुख व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## बाजार समिती कार्यालयात आमदार सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण

**माजलगाव । प्रतिनिधी**

उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा फुले पिंपळगाव येथे आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे, संचालक तथा सोळंके कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र दादा सोळंके, माजी सभापती संभाजी शेजुळ, जेष्ठ नेते अच्युत लाटे,संचालक दत्तात्रय डाके,संजय कचरे, आबाजी भोसले,भागवत शेजुळ, अमोल जाधव, श्री. नंदकिशोर सजगणे, डॉ. उद्धव नाईकनवरे, भगवान आगे, प्रभाकर होके पाटील, आसाराम घायतिडक, कादिर पठाण यांचे सह सर्व आडते, व्यापारी, मापाडी, हमाल बांधव यांचे सह अधिकारी, कर्मचारी, वृंद उपस्थित होते. यावेळी सभापती जयदत्त नरवडे यांचे समायोजित भाषण झाले.



## बीड जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या स्थानी विभागात खर्च बाबतीत प्रथमस्थानी

**बीड । प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात ३५ शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रकल्प मंजूर असून २३ शेतकरी उत्पादक कंपनींना १९.९४ कोटी अनुदान वितरीत झालेले आहे. जिल्ह्याचा खर्च २५.८ कोटी झाला असून बीड जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या स्थानी व विभागात खर्च बाबतीत प्रथमस्थानी असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान सन २०२४-२५ मध्ये ऊस योजनेत मंजूर कार्यक्रम ७.५० लाख आहे. त्यापैकी प्राप्त निधी ७.५० लाख इतके असून त्यापैकी ४.२१ लाख निधी खर्चीत असून केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विकास योजनेच्या विकास योजनेच्या (PKVVY) माध्यमांतून बीड जिल्ह्यामध्ये ८०० हे क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणले जात असून यामध्ये स्कोप प्रमाणपत्र मिळविण्यात बीड जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.

तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती विषयांतर्गत सन २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीत बीड जिल्ह्यामध्ये एकूण २१ हजार क्षेत्र नैसर्गिक शेतीमध्ये येणार असून त्यामुळे गुणवत्तापूर्ण उत्पादन घेतले जाणार आहे.रासायनिक शेतीच्या तुलनेत उत्पादन खर्चात बचत होणार आहे.

## केज येथे श्री स्वामी समर्थ मठाच्या सार्ध शतकपुर्ती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



**केज । प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मठ केज येथील श्री.स्वामी समर्थांच्या पादुका स्थापनेला दिडशे वर्ष (शतकोत्तर सुवर्ण महोत्सव) पुर्ण होत आहेत.त्या निमीत्त विश्वशांती व विश्व कल्याणासाठी पंचायतन यज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि.५ मे ते १२ मे या कालावधीत श्री स्वामी समर्थ मठामध्ये पंचायतन यज्ञ होणार आहे. यामध्ये पाच यज्ञ कुंड असणार आहेत. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंचदशाक्षरी नाम जपा चा दिनांक १४ डिसेंबर २०२४ (दत्त जयंती) या शुभ दिवसापासुन दिड कोटी जपाचा संकल्प करुन सुरुवात करण्यात आलेली होती. या नाम जपामध्ये केज शहर व परिसरातील सर्व स्वामी भक्त, सर्व समाजातील महिला पुरुष, युवक, युवती सहभागी झाले होते. त्यास महिला वर्गा तुन उस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे.या पंचायतन यज्ञामध्ये श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंधरा लाख नाम जपाचा स्वाहाकार होणार आहे. प्रधान आचार्य श्री.श्रीराम रघुनाथबुवा जोशी यांच्या अधिपत्याखाली व वेदशास्त्र संपन्न ब्रम्ह वृंदाच्या मार्गदर्शना खाली सर्व धार्मिकविधी संपन्न होणार आहेत. यात दररोज सकाळी ५.३० वाजता काकडा आरती, सकाळी ६.०० ते ७.०० श्री स्वामी समर्थांना लघु रुद्राभिषेक,७.३० ते १२.०० यज्ञ स्वाहाकार, १२.३० नैवेद्य व महाआरती.

# सचिन मुंडे यांचा पालकमंत्र्यांच हस्ते सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र पत्र देऊन गौरव

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील सचिन शेषराव मुंडे हे लातूर येथे स्थानिक गुन्हे शाखा येथे अमलदार पदावर असून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल एक मे रोजी लातूर जिल्ह्याची पालकमंत्री श्रीमंत शिवेंद्रसिंह राजे भोसले पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री व पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. याबद्दल धारूर शहरा सह तालुक्यातील अभिनंदन होत आहे.



महाराष्ट्र राज्याच्या पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या उल्लेखनिय कामाची दखल राज्याचे पोलिस महासंचालकांनी घेतली. महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कामाच्या गुणांक राज्याचे समितीचे प्रमुख राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी कर्तव्यदक्ष अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या होत्या. यामध्ये अधिकारी कर्मचारी यांच्या विशेष कामाची पावती म्हणजेच या निवडी होय त्यांनी त्यांच्या कर्तव्यावर एकनिष्ठ चोख काम केल्याबद्दल १ मे महाराष्ट्र दिनी पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे सन्मानचिन्हाचे वितरण प्रत्येक जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक कार्यालयमध्ये झाले. यामध्ये धारूर येथील सचिन मुंडे यांची निवड करण्यात आली असून स्थानिक गुन्हे शाखा लातूर येथे अमलदार पदावर काम करत आहेत. त्यांनी पोलीस विभागात वीस वर्षे आपले कर्तव्य पार पाडले. कामात एकनिष्ठता, आपल्यावर टाकलेली जबाबदारी उत्कृष्ट रित्या पार पाडणारा अमलदार म्हणजे सचिन मुंडे होय. त्याचे प्राथमिक माध्यमिक शिक्षण धारूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये झाले. तो एक उत्कृष्ट फुटबॉलपटू म्हणून तालुक्यामध्ये ओळख होती. धारूर शहरापासून चार किमी अंतरावर त्याचे मूळगाव भायजळी असून वडील शेषराव मुंडे हे धारूर येथे महावितरण विभागात कर्मचारी असल्याने ते धारूर मध्ये वास्तव्यास होता. लहानपणापासूनच पोलीस होण्याचे स्वप्न बाळगून ते पूर्णही केले व आपल्या कामाच्या जोरावर पोलीस विभागामध्ये अनेक प्रशस्तीपत्र सन्मानचिन्ह मिळवले आहेत.आणखी यामध्ये भर पडत १ मे रोजी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्रीमंत शिवेंद्रसिंह राजे भोसले तसेच लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर येथे सन्मान चिन्ह प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेष कामगिरी धारूर येथील व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अध्यक्ष अतूल शिनगारे, धारूर येथील दहावी वर्गमित्र अमोल साखरे, रामेश्वर खामकर, सुरेश शेळके, रामेश्वर तोष्णीवाल, धनंजय शिनगारे ,नाथा ढगे, महेश डूबे, वाघू खिंडरे , संतोष काळे, अमर लोकरे, दया इंदुरकर सह मित्रपरिवार यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक
# मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
शनिवार, दि.०३ मे २०२५




*बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच पॅराडाइज हॉस्पिटल मध्ये ओपन हार्ट सर्जरी (बायपास) ही डॉ. अहेमद सिद्दीक व डॉ. महेश केदार यांची टीम यांनी यशस्वी रीत्या पूर्ण केली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करताना पेशंट रामेश्वर निलाखे तसेच सोबत मोहमद लईक, आसाराम कांबळे, नागरगोजे, अक्षय धन्वे, निलेश आघाव, डॉ. विजय चरखा, डाके ज्ञानदेव, कोयटे गणेश, निलाखे नागेश, निलाखे राजू, निलाखे गुरू, निलाखे श्रीराम आणि निलाखे संतोष*

# वाढत्या तापमानामुळे आणि मानवी चुकांमुळे बीड जिल्ह्यात वनविभागात आगीच्या घटनात वाढ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात यंदा कडाक्याचा उन्हाळा जाणवत असुन दिवसाचे तापमान ४३ अंतापर्यंत पोहोचले आहे. तापमानात वाढ झाल्याने जमिन तापु लागली आहे. वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा नष्ट होऊन गवत वाळले आहे. झाडांची पाने सुकुन खाली पडली आहेत त्यामुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे वनविभागात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी मानवी चुकांमुळे पावसाळ्याच्या दिवसांत गवत व चारा चांगला येण्यासाठी नागरीकांकडुन गुपचूप हा



पालापाचोळा पेटवून दिला जातो. ही आग पुढे जाऊन वनपरिक्षेत्रात पोहोचल्याने तेथील वनसंपत्ती, वन्यप्राण्यांना याची झळ बसते. यातुन वणवा पेटुन वनविभागाचे मोठे नुकसान होते.वनविभाग आगीच्या घटनांना नियंत्रणात आणण्यासाठी शिताफीचे प्रयत्न करताना दिसत आहे. आग लागण्याची शक्यता टाळण्यासाठी वनविभागाची जागृती मोहीम, नागरीकांना सावध करणे, आग प्रतिबंधक उपाययोजना तोकड्या पडत असल्याचे दिसून येत आहे. या वणव्यात शेकडो झाडे जळून खाक होत आहेत. शेकडो पक्षी, सरपटणारे प्राणी मृत्युमुखी पडत आहेत.वनविभागाने या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देऊन डोंगराला लागणारे वनवे रोखावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. बीड तालुक्यातील बीड वनपरीक्षेत्रातील नागझरी डोंगराला काल दि.०१ गुरूवार रोजी दुपारी १ वाजता आग लागली. ऐन कडक उन्हाळ्यात आग डोंगराला आग लागल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. डोंगराला लागलेली आग विझवण्यासाठी वनविभागातील हनुमंत वायभट, दशरथ गुजर, विलास नवले, शंकर शिंदे, मधुकर नैराळे, बबन पाव्हणे ,गौतम वीर, चंद्रकांत बडगे ,महेश मेटे ,शेख अकबर, परमेश्वर पाव्हणे, परमेश्वर नाईक, शहादेव चव्हाण, बळीराम चव्हाण ,संदीप पवार ,मधुकर वायभट, लक्ष्मण जाधव आदी १५ पेक्षा जास्त वनविभागाचे कर्मचारी यांनी आटोकाट प्रयत्न करूनही आग आटोक्यात येण्यास ६ घंटे लागले. या आगीत शेकडो एक्करवरील झाडे, झुडपे जळून खाक झाली.

### ● वनविभागाच्या उपाययोजना अपुऱ्या आगीच्या घटना रोखण्यात वनविभागाला अपयश : डॉ.गणेश ढवळे

डोंगररांगांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याने ही आग वनक्षेत्रात येऊ नये यासाठी वनविभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. वनक्षेत्रात आग पसरू नये यासाठी फायर लाईन्स टाकले आहेत. गवत कापण्याचे काम केले जात आहे. तसेच आग आटोक्यात आणण्यासाठी कर्मचाऱ्यांना ब्लोअर मशीन दिलेल्या आहेत. या मशीनच्या सहाय्याने आग कशी नियंत्रणात आणावी यांचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याचे वनविभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन सांगण्यात येते .मात्र तरीही बीड जिल्ह्यातील आगीच्या घटनात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असुन वनविभागाचे प्रयत्न तोकडे पडल्याचे दिसून येत असल्याचे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

# किल्ले धारूर आगारात महाराष्ट्र तथा कामगार दिनी नवीन चार बस दाखल

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र तथा कामगार दिनी किल्ले धारूर आगारात नवीन चार बस दाखल झाल्या नवीन बसची महाराष्ट्र दिनाच्या ध्वजारोहणा नंतर आगाराचे आगार प्रमुख श्री नवनाथ चौरे यांच्या हस्ते पूजन करून बस प्रवाशांच्या सेवेत दाखल करण्यात आल्या यावेळी ज्ञानदीप विद्यालयाचे संस्थापक तथा पत्रकार अनिलजी महाजन सर शाकेर सर पत्रकार साखरे साहेब तसेच ▶▶ उर्वरित पान २ वर



# गुटख्याच्या साठ्यावर बीड पोलिसांचा छापा; १.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पेठ बीड भागात तखझ लॉन्ससमोर, बीड-परळी रोडवरील एका गोडाऊनमध्ये महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा अवैधरित्या साठवून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर काल (दि. ३० एप्रिल २०२५) मोठी कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना मिळालेल्या गुप्त माहितीनंतर त्यांनी नियंत्रण कक्षातील सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांच्या पथकाला तातडीने कारवाईचे आदेश दिले. सदर पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत संबंधित गोडाऊनची झडती घेतली असता, एका अर्धवट बांधकाम असलेल्या बंद गोडाऊनमध्ये ३५ गोण्यांमध्ये गुटख्याचा मोठा साठा आढळून आला. ▶▶ उर्वरित पान २ वर



## इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड आणि लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची सांक्षांकित प्रत असावी, विद्यार्थी दारिद्र रेषेखालील असेल तर त्यासंबंधी छायांकित प्रत व दारिद्र रेषा अनुक्रमांक नमूद करावा. पालकांची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असून यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा, वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा,

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड (प्रतिनिधी )दिनांक ०१/०५/२०२५ रोजी परळी वैजनाथ जिल्हा बीड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नवीन इमारतीच्या कोनशीला समारंभ कार्यक्रमात माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. नितीन भगवंतराव सूर्यवंशी साहेब यांचा बीड वकील संघाच्या वतीने सत्कार करताना बीड वकील संघांचे अध्यक्ष ॲड. रोहिदास येवले साहेब, उपाध्यक्ष ॲड. अविनाश गडगे साहेब, सचिव ॲड. यासेर पटेल साहेब.*

# सर्जरी विभागाचे राज्यातील सर्वात युवा प्राध्यापक म्हणून डॉ.नितीन चाटे यांची निवड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सर्जरी विभागाचे डॉ. नितीन चाटे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झाली. स्वाराती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील गेली आठ वर्षांपासून सहयोगी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळत महात्मा जोतिबा फुले योजनेच्या भरीव कामातून राज्यभर आपली ओळख निर्माण केलेल्या डॉ. नितीन चाटे यांची नुकतीच



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राध्यापक पदी निवड करण्यात आली असून पदस्थापना स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात झाली आहे. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थी म्हणून अंबाजोगाई येथे आलेल्या डॉ नितीन चाटे यांनी विद्यार्थी चळवळीत योगदान देत मार्ड संघटनेचे राज्य सचिव म्हणून काम केलेले आहे. विभागप्रमुख म्हणून गत आठ वर्षे कार्यरत असताना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागांमध्ये चाळीस वर्षानंतर वाढ करण्यात आली, बीड जिल्ह्यातील पहिली ओपन हार्ट सर्जरी करून स्वाराती रुग्णालयाची मान उंचावली आहे.स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये, महात्मा फुले योजनेचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.दि.३० बुधवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी तहसील कार्यालयात राष्ट्रध्वज फडकताच अर्ध्यातूनच सुरु झाले राष्ट्रगीत

## झालेल्या प्रकारावर तहसीलदारांकडून पडदा टाकण्याचे काम



**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त आष्टी तहसील कार्यालयात आयोजित गुरुवार दिनांक एक मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करतेवेळी राष्ट्रगीत अर्ध्यातूनच सुरू झाल्याने आष्टी तहसील प्रशासनाचा गलथान कारभार समोर आला. यावेळी आ. सुरेश धस देखील उपस्थित होते. दोषींवर कारवाई करण्याची सूचना आ. सुरेश धस यांनी केली असली तरी याबाबत तहसीलदार यांनी असे काही घडलेच नसल्याचे सांगत पडदा टाकण्याचे काम केल्याचे दिसून येत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,आष्टी तहसील प्रांगणात महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्य ध्वजारोहण संपन्न झाले. मात्र ध्वजारोहण करत असतानाच राष्ट्रगीताला आर्ध्यातून सुरुवात झाली. टेप रेकॉर्ड वरून हे राष्ट्रगीत अर्ध्यातूनच सुरू झाल्याने उपस्थित नागरिक काहीसे अवाक् झाल्याचे पहावयास मिळाले. यावेळी आ.सुरेश धस यांच्यासह माजी आ. साहेबराव दरेकर, शहराचे नगराध्यक्ष जिया बेग आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील घटनेबाबत तहसीलदार वैशाली पाटील यांना विचारले असता असा कुठलाही प्रकार झाला नसल्याचे सांगत उलट पत्रकारांनी याची शहानिशा करावी असा सल्ला देत प्रकरणावर पांगरून घालण्याचा प्रयत्न केला.

आ.धसांनी संबंधितांवर कारवाई करण्याच्या दिल्या सूचना

▶▶ उर्वरित पान २ वर

# माजलगाव शहराला नागरी समस्यांचा पडला अजगरी विळखा

## मा. मुख्यमंत्री व नगरविकास मंत्र्यांच्या शिवसेना कार्यकर्त्यांवर आली रस्ता रोको आंदोलन करण्याची वेळ



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये महिन्याभरापासून दुर्गंधी पसरली असून ठिक-ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत ती स्वच्छता करण्यात यावी व विद्युत पोलीवर लाईट बसविण्यात यावी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांनी १९ महिन्याच्या कार्यकाळामध्ये मुख्याधिकारी आणि प्रशासक म्हणून नियमबाह्य कामे करून कोठ्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे यांच्या कामाची चौकशी करून कार्यवाही करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

